सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

## डॉ. पी. सी. अलेक्झांडर

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१७ मार्च १९९७

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्य,

राज्य विधानमंडळाच्या १९९७ मधील या पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे. महाराष्ट्रात सत्ता ग्रहण केल्यानंतर माझ्या शासनाने आता दोन वर्षे पूर्ण केली आहेत. या वर्षी राज्याचा सातत्याने लक्षणीय असा सर्वांगीण विकास झालेला आहे. हे वर्ष वचननाम्यातील बहुतांश आश्वासनांच्या पूर्ततेचे वर्षदेखील आहे. या वर्षी कृषी, रोजगार, स्वयंरोजगार व क्रीडा या क्षेत्रांसाठी, सामान्य माणसाचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने, दूरगामी धोरणे आखण्यात आली. या धोरणांची अंमलबजावणी करण्याकरिता निर्धारपूर्वक पावले टाकली जात आहेत. विकासाकरिता साधनसामग्री उभारण्यासाठी, तसेच पायाभूत सुविधांच्या विविध क्षेत्रांत योग्य गुंतवणूक होण्याच्या उद्देशाने माझ्या शासनाने अभिनव उपाय योजले आहेत.

२. गेले वर्षभर राज्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती एकंदरीत शांततापूर्ण होती.

३. दीर्घकाळ अनिर्णीत असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सलोख्याने सुटावा यासाठी माझे शासन शक्य ते सर्व उपाय योजीत आहे. या संदर्भात महाराष्ट्राची बाजू मांडण्याकरिता कायदेविषयक सल्ला घेण्यासाठी भारताचे भूतपूर्व मुख्य न्यायमूर्ती श्री. य. वि. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे.

४. माझ्या शासनाने राज्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये अपर जिल्हा न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश यांची अकरा नवी न्यायालये स्थापन केली आहेत. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हा हा नवीन न्यायिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला असून त्या ठिकाणी जिल्हा व सत्र न्यायाधीश आणि अपर जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांची न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

५. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी असलेल्या वैधानिक विकास मंडळांना या वर्षी या प्रदेशांच्या विशिष्ट गरजांकडे पूर्ण लक्ष देणे शक्य झाले. कोकण प्रदेशाच्या विशिष्ट गरजांकडेदेखील लक्ष देता यावे म्हणून त्या प्रदेशाकरिता स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात यावे अशी सूचना माझ्या शासनाने भारत सरकारकडे केली आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांमधील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी १९९५-९६ मध्ये ७०० कोटी रुपये आणि १९९६-९७ मध्ये ९०० कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली होती. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) खालील माझ्या अधिकारांचा वापर करून मी ही रक्कम १९९७-९८ च्या वार्षिक योजनेमध्ये १,१०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा निदेश दिलेला आहे.

तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रश्नावर राज्याच्या वेगवेळ्या प्रदेशांतील कायदेतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर यांच्याशी व्यापक विचारविमर्श केल्यानंतर अनुच्छेद ३७१(२) खाली मी १५ जानेवारी १९९७ रोजी तीन प्रदेशांच्या विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक पाठ्यक्रमांतील जागांचे वाटप करण्यासंबंधी निदेश दिले आहेत. राज्याच्या वेगवेगळ्या प्रदेशांतील विद्यार्थ्यांमध्ये या पाठ्यक्रमांसाठी उपलब्ध होणाऱ्या जागांचे यामुळे योग्य व समन्याय प्रमाणात वाटप होईल अशी मला आशा वाटते.

६. गतवर्षी आश्वासन दिल्याप्रमाणे माझ्या शासनाने गेल्या वर्षीच्या डिसेंबरात राज्य विधानमंडळासमोर सर्वसमावेशक अशा कृषिविषयक धोरणाचा मसुदा सादर केला. राज्यामध्ये या धोरणाला व्यापक प्रतिसाद मिळत असून त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

कृषिविषयक धोरणाच्या या मसुद्यात शेतकरी हा केंद्रबिंदू मानून इतर गोष्टींबरोबरच जिल्ह्यांमध्ये मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्रे व कृषि बहुचिकित्सालये स्थापन करण्याचा आणि तालुक्यांमध्ये कृषि चिकित्सालये स्थापन करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत आहे. यामुळे शेतीसंबंधी तंत्रज्ञान जलद गतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे सुलभ होईल.

राज्यातील शेतीचे तंत्र सुधारावे, त्याचप्रमाणे अत्याधुनिक जलव्यवस्थापन पद्धती सुरू कराव्यात या दृष्टीने, माझ्या शासनाने इस्राएलच्या तज्ज्ञांच्या सहाय्याने सुरुवातीला अकोला येथे कापसाकरिता एक मध्यवर्ती प्रात्यक्षिक्र प्रक्षेत्र स्थापन करण्याचे ठरविले आहे. या कार्यक्रमामुळे राज्यातील विदर्भासारख्या कापूस पिकवणाऱ्या क्षेत्राचा बराच फायदा होण्याची शक्यता आहे.

७. पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसायासाठी सर्वंकष धोरण तयार करण्याचा माझ्या शासनाचा मानस आहे. पशुआरोग्य सेवांचा दर्जा वाढविणे, राज्यात रोगमुक्त क्षेत्रे निर्माण करणे, संकरित गायींच्या कार्यक्रमात सुधारणा करणे, स्थानिक पैदाशीच्या जाती जतन करणे आणि शेळी, मेंढी व कुक्कुटपालनाच्या विकासास विशेष प्राधान्य देणे यांचा यात

अंतर्भाव राहील. मत्स्यव्यवसायविषयक धोरणामध्ये सागरी मत्स्यव्यवसायाबरोबरच नदी इत्यादीतील मत्स्यव्यवसायाचा विकास, गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धन आणि पायाभूत सुविधांच्या विकासाची तरतूद यांवर अधिक भर देण्यात येईल.

८. औद्योगिक प्रगतीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात कायम आघाडीवर राहिलेला आहे. १९९१ मध्ये आर्थिक उदारीकरणाचे युग सुरू झाल्यापासून देशातील कोणत्याही राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राकडे मोठ्या औद्योगिक प्रकल्पांचे सर्वाधिक प्रस्ताव आलेले आहेत. औद्योगिक उद्योजक ज्ञापने, इरादापत्रे, १०० टक्के निर्यातप्रधान उद्योग यांची एकूण ५,९१० ही संख्या देशातील कोणत्याही राज्यापेक्षा अधिक आहे. थेट विदेशी गुंतवणूक अपेक्षित असलेल्या मान्य प्रस्तावांच्या संख्येच्या बाबतीतही आपले राज्य अग्रेसर आहे.

माझ्या शासनाने विदर्भ व मराठवाड्यासाठी विद्युत शुल्क, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतींमधील जमिनीचे दर आणि मुद्रांक शुल्क यासंबंधात महत्त्वाच्या सवलती जाहीर केल्या. मोठ्या व मध्यम उद्योगांतील भांडवली गुंतवणुकीकरिता विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे.

आतापर्यंत राज्य खनिकर्म महामंडळासाठी राखून ठेवलेल्या २४ लाख एकरांच्या अतिशय मोठ्या क्षेत्राचे आरक्षण उठवण्याचा ऐतिहासिक निर्णय माझ्या शासनाने घेतला आहे, त्यामुळे खाजगी उद्योजकांना तेथील खनिज संपत्ती काढता येईल. खनिज संपत्तीने समृद्ध असलेले ९८ टक्के क्षेत्र विदर्भात असल्यामुळे तेथील खाणकामास अधिक चालना मिळेल.

पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढावी या दृष्टीने राज्य शासनाने मुंबईत १६ ते १८ फेब्रुवारी १९९७ या काळात '' ॲडव्हान्टेज महाराष्ट्र '' हे जागतिक गुंतवणूकदारांचे संमेलन आयोजित केले होते. इंडसइंड, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, तसेच इन्फ्रास्ट्रक्चर लीझिंग अँड फिनान्शिअल सर्व्हिसेस यांच्या सहकार्याने हे संमेलन आयोजित केले होते. वीज, बंदरे, स्थावर संपदा, टेक्नॉलॉजी पार्क, औद्योगिक वसाहती, रस्ते व पूल, विरंगुळा व करमणूक, पर्यटन व संस्कृती यांसारख्या क्षेत्रांतील अंदाजे १७,००० कोटी रुपये खर्चाचे ५० हून अधिक पायाभूत सुविधांविषयक प्रकल्पांचे प्रस्ताव या संमेलनात प्रतिनिधींसमोर रीतसर मांडण्यात आले. कित्येक प्रकल्पांचे बोलीसंबंधी दस्तऐवजदेखील विकायला ठेवले होते. भारताचे पंतप्रधान माननीय श्री. एच. डी. देवेगौडा यांनी या संमेलनाचे उद्घाटन केले. या संमेलनाला फार उत्तम प्रतिसाद मिळाला. ५०० प्रतिनिधी येतील अशी अपेक्षा असताना २०० अनिवासी

भारतीय आणि विदेशी नागरिक मिळून एकूण ९२२ प्रतिनिधी यात सहभागी झाले. जवळ-जवळ ३० देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. संमेलन प्रसंगी एकूण १८२ बोलींसंबंधीचे दस्तऐवज खरेदी करण्यात आले. आता हे सर्व प्रकल्प कमीत कमी वेळात प्रत्यक्षात येतील याची निश्चिती करणे हा माझ्या शासनाचा प्रयत्न राहील.

पायाभूत सोयी वाढवल्यामुळे उद्योगांना जोरदार गती मिळेल व त्यायोगे पायाभूत, निर्माणक व सेवा क्षेत्रांमध्ये मोठी रोजगारक्षमता निर्माण होईल. विशिष्ट प्रकल्पांद्वारे गुंतवणूक आकर्षित करण्याबाबत राज्याने घेतलेल्या पुढाकाराचा माननीय पंतप्रधानांनी गौरव केला. महाराष्ट्र राज्याचा धडा इतर राज्यांनी गिरवावा, असेही ते म्हणाले.

९. पुन्हा वाटाघाटी करून निश्चित करण्यात आलेल्या दाभोळ वीज प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम १० डिसेंबर १९९६ पासून सुरू झाले आहे. १९९८ अखेरीस या प्रकल्पाचा टप्पा–एक कार्यान्वित होईल अशी अपेक्षा असून त्यामुळे ग्रिडमध्ये आणखी ७४० मेगावॅट विजेची भर पडेल. दाभोळ वीज कंपनीने या प्रकल्पाच्या १४४४ मेगावॅट इतकी वीजनिर्मिती करणाऱ्या दुसऱ्या टप्प्यासाठी यापूर्वीच तयारी सुरू केली आहे. या वर्षअखेर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू होईल अशी अपेक्षा आहे. खाजगी क्षेत्रात १४९२ मेगावॅट वीजनिर्मिती करणारे दोन इतर प्रकल्पदेखील लवकरच अंतिम स्वरूपात निश्चित होतील.

या प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम या वर्षात सुरू होईल अशी अपेक्षा आहे. हे वीज प्रकल्प लवकर पूर्ण होण्याकरिता माझे शासन शक्य ते सर्व उपाय योजील. आणखी वीज उपलब्ध होण्यासाठी शासनाने ७ वीज प्रकल्पांकरिता देकार मागवण्याचे ठरवले आहे. हे ७ प्रकल्प राज्याच्या महत्त्वाच्या वेगवेगळ्या एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रांत असतील व त्यातून साधारण ११०० मेगावॅट वीज निर्माण होईल.

महाराष्ट्राची उसाच्या चिपाडापासून वीजनिर्मिती करण्याची क्षमता सुमारे १००० मेगावॅट आहे. अजून ही क्षमता वापरात आलेली नाही. माझ्या शासनाने उसाच्या चिपाडापासून वीजनिर्मिती करण्याच्या प्रकल्पांना उत्तेजन देण्याचे ठरवले असून एकूण ६० मेगावॅट विजेची निर्मिती करू शकणाऱ्या दोन प्रकल्पांना यापूर्वीच मान्यता दिली आहे. याशिवाय १२७ मेगावॅट वीज निर्माण करण्यासाठी ६ वीजनिर्मिती प्रकल्प स्थापन करण्याच्या दृष्टीने निविदा मागवल्या आहेत.

१०. मला हे नमूद करण्यास अत्यंत आनंद होत आहे की, कोकण रेल्वे प्रकल्पातील मुंबई-सावंतवाडी रेल्वे मार्गावर माल वाहतुकीबरोबरच प्रवासी वाहतूकही आता सुरू

करण्यात आली आहे. महाराष्ट्रात ३८२ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाचे काम माझ्या शासनाच्या सक्रिय सहभागाने आता पूर्ण झाले आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाचे कार्य नोव्हेंबर, १९९६ पासून सुरू झाले आहे. हे मंडळ स्थापन झाल्यामुळे राज्यातील लहान बंदरांच्या विकासासाठी आवश्यक ते उत्तेजन मिळू शकेल.

माझ्या शासनाने खाजगी क्षेत्राच्या सहभागाने बंदरांचा विकास करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ठाणे जिल्ह्यातील वढवण येथील बंदराचा विकास करण्याकरिता पी. अँड ओ. ऑस्ट्रेलिया पोर्ट्स या कंपनीला इरादापत्रही देण्यात आले आहे. ही कंपनी पहिल्या टप्प्यात सुमारे १,०८० कोटी रुपये इतकी गुंतवणूक करील अशी अपेक्षा आहे.

११. राज्याचा औद्योगिक विकास त्वरेने घडवून आणण्यासाठी माझ्या शासनाने औद्योगिक विकास केंद्रे आणि जिल्ह्यांची शहरे हवाई मार्गाने जोडण्याकरिता स्पॅन एव्हिएशन इंडिया लिमिटेड ही संयुक्त उपक्रम कंपनी सुरू केली आहे. मुंबई-कोल्हापूर, पुणे-नागपूर आणि पुणे-मुंबई या सेवा सुरू झालेल्या आहेत. टप्प्याटप्प्याने इतर जिल्ह्यांना आपल्या सेवा उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा मानस आहे.

१२. माझ्या शासनाने राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची तरतूद करण्याचे धोरण जाहीर केले होते. या वर्षात ६१ औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या, त्यामुळे राज्यातील एकूण ३२५ तालुक्यांपैकी २४१ तालुक्यांमध्ये ही सुविधा उपलब्ध झालेली आहे.

माझ्या शासनाने या वर्षात चंद्रपूर व जळगाव येथे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली आहेत.

राज्यात संस्कृत विद्यापीठाची स्थापना करण्यात येत आहे हे सांगण्यास मला आनंद होत आहे.

१३. सर्वांना प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या माझ्या शासनाच्या धोरणास अनुसरून १९९६-९७ या वर्षात, शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या १०३ गटांतील इयत्ता चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यास आणि या गटातील पहिलीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यास मंजुरी देण्यात आली.

मुलींच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी ग्रामीण भागातील पाचवी ते दहावी इयत्तांमध्ये शिकणाऱ्या सुमारे २.२६ लाख मुलींना घरापासून शाळेपर्यंत व परत घरापर्यंत

राज्य परिवहन बसगाड्यांमधून विनामूल्य प्रवास करण्यासाठी प्रवासपत्रे देण्यात आली आहेत.

राज्यातील, स्त्री साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय पातळीपेक्षा कमी असलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये मुलींसाठी राखून ठेवलेल्या जागांवर १९९६-९७ मध्ये सुमारे १,९०० मुलींना डी.एड. महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात आला.

ऊस तोडणीसाठी येणाऱ्या स्थलांतरित कामगारांच्या मुलांकरिता माझ्या शासनाने १९९६-९७ या वर्षात साखर कारखान्यांच्या परिसरात १० शाळा सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशपद्धतीचे नियमन करण्याच्या दृष्टीने या अधिवेशनात एक विधेयक मांडण्याचा माझ्या शासनाचा विचार आहे.

धुळे, नागपूर, अमरावती, चंद्रपूर, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये सैनिकी शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. १९९७-९८ या वर्षात, कोल्हापूर, सांगली व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये अशा शाळा सुरु करण्याकरिता आणि पुणे जिल्ह्यात महिला सैनिकी शाळा सुरू करण्याकरिताही परवानगी देण्यात आली आहे.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमाला चालना देण्याकरिता माझ्या शासनाने महाराष्ट्र राज्य साक्षरता परिषदेची स्थापना केली आहे.

१४. ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगरकरिता नवीन महानगरपालिका स्थापन करण्यात आली आहे. सांगली, मिरज आणि कुपवाड नगरपरिषदांचा समावेश असलेल्या सांगली–मिरज क्षेत्राकरिता आणि नांदेड व वाघाळा नगरपरिषदांचा समावेश असलेल्या नांदेड शहराकरिता महानगरपालिका लवकरच स्थापन करण्यात येतील.

१५. माझ्या शासनाने राज्यातील ५०० हून अधिक लोकसंख्या असणाऱ्या सर्व गावांमध्ये खडीचे रस्ते बांधण्याचे महत्त्वाचे काम रोजगार हमी योजनेअंतर्गत हाती घेतले आहे. या वर्षी या कार्यक्रमाखाली प्रत्येक जिल्ह्यातील २०० गावे याप्रमाणे २९ जिल्ह्यांमध्ये रस्त्यांची कामे हाती घेण्याचे ठरवले आहे. याकरिता, रोजगार हमी योजनेखालील मानके योग्य त्या प्रमाणात शिथिल करण्यात आली आहेत.

१६. १९९६-९७ पर्यंत मूलभूत किमान सेवा कार्यक्रमाखाली सुमारे ८९ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्यात आली आहेत आणि ६१,२५७ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे. रस्त्यांचे प्रकल्प खाजगी क्षेत्राच्या सहभागाने

राबविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य मार्ग विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.

या महामंडळाने राज्यातील महत्त्वाच्या रस्त्यांवर अनेक ठिकाणी रेल्वेचे ओव्हरब्रिज बांधण्यासाठी इरकॉन या भारत सरकारच्या उपक्रमाबरोबर बांधा, वापरा, हस्तांतरण करा तत्त्वावर सामंजस्य करार केलेला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये, सुमारे ३०० कोटी रुपये खर्चाची २९ ओव्हरब्रिजची कामे सुरू करण्यात येतील. या बांधकामांपैकी १०३ कोटी रुपये खर्चाची १० बांधकामे लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.

१७. मला सांगण्यास आनंद वाटतो की, कृष्णा नदीच्या पाण्यातील आपल्या हिश्श्याच्या पाण्याचा २००० सालापूर्वी वापर करून घेण्यासाठी माझ्या शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने चालू वर्षात विक्रीस काढलेल्या पहिल्याच रोख्यांना जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. कृष्णा खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १,०४७ कोटी रुपये इतकी रक्कम उभी राहिली. कृष्णा खोऱ्यातील उपसा सिंचन योजनांसह सर्व मोठे, मध्यम व लहान पाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे २२ लाख हेक्टरांचे क्षेत्र ओलिताखाली येईल. या क्षेत्रापैकी सुमारे १३ लाख हेक्टर क्षेत्र कृष्णा खोऱ्यातील अवर्षणप्रवण भागांमधील असेल.

विदर्भात अंदाजे ३,८०० कोटी रुपये इतक्या खर्चाच्या दहा मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांचे चालू असलेले काम पूर्ण करण्याकरिता स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यासाठीही माझे शासन बांधील आहे.

जून १९९७ पर्यंत राज्यात आणखी सुमारे ९१,००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल अशी अपेक्षा आहे.

१८. सार्वजनिक वितरण यंत्रणेमार्फत वितरित केल्या जाणाऱ्या पाच जीवनावश्यक वस्तूंच्या किरकोळ विक्रीच्या किंमती चालू वर्षात स्थिर राहतील याची माझ्या शासनाने खात्री करून घेतली आहे.

राज्यात २,८७६ झुणका-भाकर केंद्रे कार्यरत असून त्यांचा १० लाखांहून अधिक लोकांना लाभ होत आहे. ३१ मार्च १९९७ रोजी अशी एकूण ४,००० केंद्रे कार्यरत होतील अशी अपेक्षा आहे.

माझ्या शासनाने नवसंजीवन योजनेखाली पावसाळ्यात ७२ हंगामी गोदामे उघडली आणि आदिवासी लोकांना वाटप करण्यासाठी ८,५०० क्विंटल धान्य उधारीवर दुकानदारांना दिले.

या धान्याचे फिरत्या रास्त भाव दुकानांमार्फत २१३ आदिवासी गावांना वाटप करण्यात आले आणि इतर १६४ गावांमध्ये आदिवासींना अन्नधान्यांचा सुरळीत पुरवठा होण्याकरिता रास्त भाव दुकाने शासकीय कर्मचाऱ्यांच्यामार्फत चालवण्यात आली.

१९. बृहन्मुंबईतील ४० लाख झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देण्याच्या योजनेखाली सर्व कार्यवाही 'एक खिडकी पद्धती' नुसार एकाच यंत्रणेमार्फत व्हावी यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. आलेल्या ३७२ प्रस्तावांपैकी २७२ प्रस्तावांना आतापर्यंत मंजुरी देण्यात आलेली आहे.

२०. निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी मुख्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी समितीने ४५ योजना सुचविल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी केल्यास, सुमारे ५६ लाख बेरोजगारांची समस्या प्रभावीपणे सोडविता येईल अशी अपेक्षा आहे.

२१. ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार पुरविणे ही माझ्या शासनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. मुख्यतः या प्रयोजनासाठीच रोजगार हमी योजना राबवली जाते. या वर्षी या योजनेखाली ५.७७ कोटी श्रमदिवस इतका रोजगार निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. त्याशिवाय या वर्षाच्या जानेवारी अखेरपर्यंत केंद्रपुरस्कृत जवाहर रोजगार योजना व रोजगार हमी योजना या योजनांखाली अंदाजे ४.१९ कोटी श्रमदिवस इतका रोजगार निर्माण करण्यात आला.

या वर्षी दशलक्ष विहीर योजनेखाली ५,०२३ विहिरींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

इंदिरा आवास योजनेखाली या वर्षी २३,२२३ घरे बांधण्यात आली.

२२. बालमजुरांची प्रथा नष्ट करण्यासाठी माझे शासन बांधील आहे. या प्रयोजनासाठी संपूर्ण राज्यात आधारभूत पाहणी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

२३. वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांमध्ये निपुण असलेल्या मुलांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्याच्या दृष्टीने तयारी करवून घेण्याकरिता माझ्या शासनाने पुण्याजवळ बालेवाडी येथे श्री शिवछत्रपती क्रीडा विद्यापीठ आणि पुणे, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, औरंगाबाद व नागपूर येथे सहा क्रीडा प्रबोधिनी स्थापन केल्या आहेत. अशा ११ प्रबोधिनी स्थापन करण्याचे योजिले असून त्यांपैकी एक प्रबोधिनी आदिवासी मुलांमधील सुप्त क्रीडागुणांचा शोध घेण्यासाठी गडचिरोली येथे असेल.

शारीरिक शिक्षण व क्रीडा यांची सांगड शालेय अभ्यासक्रमाशी घालून त्याद्वारे राज्यात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी माझ्या शासनाने प्रथमच एक क्रीडा धोरणही ठरविले असून ते राज्य विधानमंडळाला सादर करण्यात आले आहे.

२४. राज्यात नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तालुक्यांसाठी २२ नवीन पंचायत समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

माझ्या शासनाच्या पुढाकाराने अनुसूचित क्षेत्रे पंचायती राज पद्धतीच्या कक्षेत आणण्यात आली आहेत.

भारतीय संविधानाच्या ७३ व्या व ७४ व्या सुधारणांमध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांची साधनसंपत्ती वाढवण्यासाठी व या संस्थांना साधनसंपत्ती उपलब्ध करून देण्यासंबंधी शिफारशी करण्याकरिता राज्य वित्त आयोग नेमण्यात आला. राज्य वित्त आयोगाने नुकताच आपला अहवाल सादर केला आहे.

२५. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वृद्धाश्रम स्थापन करण्यासाठी हाती घेतलेल्या मातोश्री वृद्धाश्रम योजनेचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर येथील वृद्धाश्रमाचे बांधकाम पूर्ण झाले आहे; तर कोल्हापूर, नाशिक, धुळे, औरंगाबाद, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर येथील वृद्धाश्रमांचे बांधकाम पूर्ण होत आले आहे.

अनुसूचित जातींना न्याय देण्याच्या संबंधात गतवर्षी आश्वासन दिल्याप्रमाणे विशेष घटक योजनेची प्रमाणानुसार व्याप्ती वाढवून जनजाति उपयोजनेच्या धर्तीवर ती राबवण्याचे काम आता सुरू झालेले आहे ही माझ्या शासनाच्या दृष्टीने अतिशय अभिमानाची गोष्ट आहे.

२६. पोलिओ या महाभयंकर रोगाचे निर्मूलन करण्यासाठी या वर्षीदेखील माझ्या शासनाने संपूर्ण राज्यात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वी रीत्या राबविली आहे.

राज्यातील एड्सच्या प्रादुर्भावास प्रभावीपणे आळा घालण्याच्या दृष्टीने माझ्या शासनाने एक शिखर समिती स्थापन केलेली आहे. या उपाययोजनेची सर्व देशभर प्रशंसा करण्यात आलेली आहे. एड्सच्या झपाट्याने होत असलेल्या फैलावास प्रभावीपणे प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने रक्तविषयक सुरक्षितता आणि रक्त संक्रामण सेवा यांच्या संबंधातील सर्व महत्त्वाच्या समस्या हाताळण्यासाठी राज्य रक्त संक्रामण परिषददेखील स्थापन करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील वाहतुकीत वाढ झाल्यामुळे रस्त्यांवरील अपघातांच्या संख्येतही झालेली वाढ माझ्या शासनाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. अशा अपघातांची

संख्या शक्य तितकी कमी करण्यासाठी निकडीचे उपाय योजण्यात येत असून त्वरित वैद्यकीय मदत व आघात उपचार पुरविण्यासाठी ग्रामीण व कुटीर रुग्णालयांमध्ये यापूर्वीच ५ युनिटे सुरू करण्यात आली आहेत. या वर्षी या सुविधांमध्ये भरीव वाढ करण्यात येईल.

२७. आश्रमशाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी माझ्या शासनाने या वर्षी राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांकरिता १४४ मध्यवर्ती आश्रमशाळा सुरू केल्या आहेत. प्रत्येक पाच आश्रमशाळांपैकी एक शाळा मध्यवर्ती आश्रमशाळा म्हणून निश्चित करण्यात आलेली आहे.

आश्रमशाळांमधील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याचेही योजिले आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या राहण्याच्या जागेपासून जवळच्या ठिकाणी बारावी इयत्तेपर्यंतच्या उच्च शिक्षणाचा लाभ मिळावा म्हणून माझ्या शासनाने जनजाति उपयोजना क्षेत्रातील १४ जिल्ह्यांपैकी प्रत्येक जिल्ह्यात कला व विज्ञान विद्याशाखेचे एक कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याचे योजिले आहे.

२८. केंद्र सरकारने एकाधिकार कापूस खरेदी योजनेला आणखी दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. या हंगामातदेखील माझ्या शासनाने शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात येणाऱ्या सुपर या जातीच्या कापसासाठी दर क्विंटलला २,१०० रुपये एवढा किफायतशीर भाव देण्याचे घोषित केले आहे.

२९. माझ्या शासनाने राज्यात पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेची पुनर्रचना करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण म्हणून पुनर्रचना करण्यात आली आहे. प्रादेशिक मुख्य अभियंत्यांची आणि जिल्हा पाणीपुरवठा अधिकाऱ्यांची त्यावर नेमणूक करण्यात आली असून पालक मंत्री अध्यक्ष असलेल्या जिल्हा पाणीपुरवठा समितीच्या मार्गदर्शनाखाली हे अधिकारी काम करतील. प्रशासनिक मंजुरी, तांत्रिक मंजुरी व निविदा स्वीकृती यांच्यासंबंधातील क्षेत्रीय पातळीवरील कार्यालयांच्या अधिकारांमध्येदेखील बरीच वाढ करण्यात आली आहे.

माझ्या शासनाने राज्याच्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये दरवर्षी पाच लाख स्वच्छतागृहे बांधण्याचा भरीव कार्यक्रमही हाती घेतला आहे.

३०. या वर्षी महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम त्वरेने पूर्ण करण्यासाठी शक्य ती सर्व कार्यवाही करण्यात आली आहे. जागतिक बँक, ओडीए आणि यूएनडीपी यांच्या मदतीने माझ्या शासनाने एक सविस्तर बहुविध संकटकालीन व्यवस्थापन योजना तयार करण्याचे कामदेखील सुरू केले आहे.

सहा जिल्ह्यांमधील १,९०६ खरीप गावांमध्ये टंचाईची परिस्थिती आहे. टंचाईची झळ कमी करण्यासाठी आणि टंचाईग्रस्त गावांमधील लोकांना रोजगार देण्यासाठी माझ्या शासनाने उपाययोजना केल्या आहेत.

३१. सन्माननीय सदस्यांना सांगण्यास मला आनंद वाटतो की, राज्यातील स्थानिक संस्थांच्या निवडणुका सुरळीतपणे व शांततेने पार पडल्या आहेत.

३२. अभूतपूर्व अशा चक्रीवादळाने आपल्या शेजारच्या आंध्र प्रदेश राज्यातील जनजीवन व अर्थव्यवस्था पार उध्वस्त करून टाकली. माझ्या शासनाने तात्काळ निर्णय घेतला आणि वादळग्रस्त जनतेला ५० लाख रुपयांची मदत दिली आणि त्याशिवाय निरनिराळ्या संस्था, संघटना व व्यक्ती यांनाही वादळग्रस्त लोकांना रोख व वस्तुरूपाने मदत देण्यास प्रवृत्त केले.

३३. सन्माननीय सदस्यहो, चालू अधिवेशनात आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येतील अशा पूरक मागण्या, १९९७–९८ चा अर्थसंकल्प, लेखानुदान, विवक्षित अध्यादेशांचे अधिनियमांमध्ये रूपांतर करणारी विधेयके, प्रलंबित आणि नवीन विधेयके व इतर तातडीचे शासकीय आणि अशासकीय कामकाज यावर आपल्याला विचार करावयाचा आहे. आपल्या विचारविमर्शास मी सुयश चिंतितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई